# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.११९८, १२०० /२०२४ /त.क्र.४४, ४५ /२०२६

श्री.मेहुल मनीलाल हरिआ

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२१)
४ था मजला, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता उप सचिव (नवि-२१)
४ था मजला, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (टी विभाग)
झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता (टी विभाग)
झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रार क्र.४४ व ४५ या प्रकरणी तक्रारदार श्री.हरिआ यांनी तक्रार दाखल केली असून यावर या आधीच **दि.२३.०९.२०२५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले आहेत:-**

सदर तक्रारीवर आज दि.२३.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मूळ द्वितीय अपिल क्र.५७५२ यात अपिलार्थी श्री.हरीआ यांनी दाखल केलेल्या दि.२६.०८.२०२४ रोजी तत्कालिन **मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी आदेश पारित केले असून ते खालीलप्रमाणे आहेत:-**

जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी अपिलार्थीने **जोडपत्र अ** मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत

अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन ई-मेल आय.डी. वर नोंदणीकृत टपालाने लेखी सूचना पाठविण्यात यावी. त्यानंतर माहितीचे अवलोकन देवून, अवलोकनअंती त्यांनी हवी असलेली मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस त्याच दिवशी व्यक्तीशः विनामूल्य देण्यात यावी. तसेच जी माहिती उपलब्ध होत नाही त्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करुन अपिलार्थीस लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.

तसेच हीच माहिती अपिलार्थीनी दाखल केलेल्या द्वितीय अपिल क्र.०००८०१ यात बृहन्मुंबई खंडपीठासमोर देखील दाखल करण्यात आली होती व त्यावर नुकतीच दि.२२.०८.२०२५ रोजी मा.आयुक्त यांनी त्या संदर्भात आदेश देखिल पारित केलेले आहेत. उपरोक्त प्रकरण हे मूळात बृहन्मुंबई खंडपीठासमोर

दाखल करणे अपेक्षित असून या संदर्भात उपरोक्त दोन्ही प्रकरणात आज मुख्यालयात सुनावणीस आले असून यात ज्यांना माहिती प्रदान करण्याचे आदेश देण्यात आले आहेत ते तत्कालिन जन माहिती अधिकारी एस.आर.ए. झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांनी उपरोक्त आदेश प्राप्त होताच दि.११ नोव्हेंबर, २०२४ रोजी अपिलार्थीना लेखी प्रतिसाद दिला असून कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली असल्याचा दावा केला आहे. तथापि, दिलेला प्रतिसाद हा आदेशाशी विसंगत असून वस्तुस्थितीशी देखिल विसंगत असल्याचा आरोप करीत अपिलार्थी श्री. हरीआ यांनी उपरोक्त तक्रार अर्ज **कलम १८ (१)** अन्वये दाखल केलेला आहे.

यामध्ये श्री. सचिन गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केल्याचे प्रथम दर्शनी आढळून येत नाही. ही बाब लक्षात घेता श्री. सचिन गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता टी विभाग, यांनी **कलम २० (१)** अन्वये त्यांचा लेखी खुलासा २ आठवडयात सादर करावा त्यानंतर यावर पुढील सुनावणी घेण्यात येईल. उपरोक्त खुलासाची एक प्रत ही अपिलार्थीना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल वर पाठविण्यात यावी.

तसेच या प्रकरणी तक्रारदार यांनी बृहन्मुंबई खंडपीठाकडे अपिल क्र.०००८०१ दाखल केला असून त्यावर मा.आयुक्त यांनी दि.२२.०८.२०२५ रोजी अपिल अर्ज निकाली काढत असताना **खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-**

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (व्ही.सी. माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी ईमेलव्दारे लेखी सादर करुन नमुद केले की, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी त्यांचे माहिती अर्जाच्या अनुषंगाने परिपत्रक दि.०६.०२.२०२१ ची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. जेव्हा की, एका अन्य स्वतंत्र माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दि.२२.०२.२०२१ रोजी दुय्यम अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना

लिहिलेल्या पत्राची प्रत प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीच्या मते जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी उचित माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या माहितीप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे परिपत्रक दि.०६.०२.२०२१ नंतर कोणतेही नवीन परिपत्रक निर्गमित करण्यात आले नाही तसंच, वृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निर्गमित करण्यात आलेले पत्र दि.२२.०२.२०२१ त्यांचेकडे सद्या उपलब्ध नसल्याने त्यावर भाष्य करु शकत नाही.

अपिलार्थी यांनी आयोगासमोर सुनावणी दरम्यान नमुद केलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पत्र दि.२२.०२.२०२१ ची प्रत जन माहिती अधिकारी यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०२.२०२१ चे पत्र अपिलार्थीकडून प्राप्त झाल्यावर ३० दिवसांत त्यांचे परिपत्रक दि.०६.०२.२०२१ च्या अनुषंगाने सदर विषय वरिष्ठांच्या निदर्शनास आणून ओपडपट्टो पुनर्वसन प्राधिकरणाचे सद्याचे धोरणाविषयी वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थीना द्यावे.

तक्रारदार श्री.हरिआ यांच्या म्हणण्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथील जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून दिशाभूल करणारी माहिती दिली असून दि.०६.०२.२०२१ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निर्गमित करण्यात आलेले दि.२२.०२.२०२१ रोजीचे परिपत्रक त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे तसेच त्यानंतर कोणतेही नविन परिपत्रक निर्गमित करण्यात आले नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे वक्तव्य हे मा.बृहन्मुंबई खंडपीठ आयुक्त यांनी त्यांच्या आदेशात नमूद केले आहेत. प्रस्तुत तक्रार अर्जात तक्रारदार यांनी **कलम १९ (८) (ख)** अन्वये नुकसान भरपाई तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याचे व चौकशीचे आदेश देण्याची मागणी केली असून **कलम २५ (५)** प्रमाणे निर्देश देखील जारी करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी दि.२६.०८.२०२४ रोजीच्या आदेशानंतर प्राधिकरणाच्या वतीने दि.११.११.२०२४ रोजी तक्रारदार यांना प्रतिसाद देण्यात आला असून कार्यालयात उपलब्ध अभिलेखानुसार दस्तऐवजांचे व सामग्रीचे निरीक्षण, अवलोकन करण्याकरीता सूचित केले असून त्यांच्या मुद्दा क्र.१ ते ३ बाबत मुद्देनिहाय प्रतिसाद देखिल दिला असल्याचे याच अनुषंगाने तक्रारदार यांनी नगरविकास विभाग येथे दाखल अर्जाचे हस्तांतरण **कलम ६ (३)** अन्वये महानगरपालिकेकडे केले असल्याचे आढळून येते. तथापि, दिलेला प्रतिसाद हा आदेशाशी विसंगत असून वस्तुस्थितीशीही विसंगत असल्याचे तक्रारदार यांनी आक्षेप नोंदविलेला आहे. या प्रकरणी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ही तसेच दि.०६.०२.२०२१ रोजीचे **परिपत्रक** हे या आधीच देण्यात आले असून तक्रारदार यांच्या अर्जानुसार तत्कालिन महानगरपालिका आयुक्त यांनी दि.२२.०२.२०२१ रोजी

झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण यांना लिहीलेले पत्र हे प्राप्त झाले असतानाही ते जाणूनबुजून दडविण्यात येत असल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी दिलेल्या खुलासात तसेच दि.०१.१०.२०२५ रोजी तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीना प्रतिसाद दिला असल्याचे नमूद केले असून झालेल्या सुनावणीनुसार खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे व तो खुलासा समाधानकारक नसल्याचे तक्रारदार यांनी देखिल लेखी स्वरुपात कळविले आहे.

सादर केलेला खुलासा व त्यावर तक्रारदार यांचे उत्तर याचे अवलोकन केले असता यात जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२२.०८.२०२५ रोजीच्या बृहन्मुंबई खंडपीठाच्या सुनावणी नंतर **खालीलप्रमाणे उत्तर सादर केलेले आहे :-**

दि.२२.०८.२०२५ रोजी मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकड झालेल्या द्वितीय अपील सुनावणीमध्ये खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०२.२०२१ चे पत्र अपिलार्थीकडून प्राप्त झाल्यावर त्यांचे परिपत्रक दि.०६/०२/२०२१ च्या अनुषंगाने सदर विषय वरिष्ठांच्या निदर्शनास आणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सद्याचे धारणाविषयी वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलाथांना द्यावं."

तदनंतर अर्जदार श्री. मेहुल हरिया यांचा दि.१४.०९.२०२५ रोजीचा ई-मल प्राप्त झाला असून सदर ई-मेलमध्ये त्यांनी वर नमूद केलले बृहन्मुंबई महानगर पालिकेचे दि.२२/०२/२०२१ रोजीचे पत्र हे दि.१३.०३.२०२५ रोजी निम्नस्वाक्षरीकाराला ई-मेलद्वार पाठविल्याचे नमूद केले आहे. त्यानंतर निम्नस्वाक्षरीकाराने सदर दि.१४.०९.२०२५ रोजीच्या ई-मेलच्या अनुषंगाने अर्जदार यांना असे कळविले आहे की, निम्नस्वाक्षरीकाराचा ई-मेल प्लॅटफॉर्म हा Sky connect वरून Outlook वर स्थलांतरित करण्यात आला असल्यामुळे मे-२०२५ पूर्वी प्राप्त झालेले ई-मेल्स हे सध्या वापरत असलेल्या ई-मेल खात्यात उपलब्ध नाहीत त्यामुळे सदर बृहन्मुंबई महानगर पालिकेचे दि.२२/०२/२०२१ रोजीचे पत्र हे निम्नस्वाक्षरीकाराकडे उपलब्ध नसल्यामुळे सदर पत्र पुन्हा पाठविण्यात यावे. त्यानंतर अर्जदार यांनी दि.१८.०९.२०२५ रोजीच्या ई-मेलने सदर बृहन्मुंबई महानगर पालिकेचे दि.२२.०२.२०२१ रोजीचे पत्र निम्नस्वाक्षरीकारास पाठविले. त्यानंतर अर्जदार श्री.मेहुल हरिया यांना दि.२५/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे वस्तुस्थितीदर्शक उत्तर देण्यात आले आहे.

वरील बाबीच्या अनुषंगाने निम्नस्वाक्षरीकाराने अर्जदार श्री. मेहुल हरिया यांना त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती विहित वेळेत विनामुल्य देण्यात आलेली आहे.

**कलम २ (च)** नुसार जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य हे त्यांच्याकडे **कलम २ (च)** नुसार उपलब्ध असलेली माहिती ही अर्जदारांना उपलब्ध करुन देणे असे असून जन माहिती अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती वा प्राधिकरणाच्या अखत्यारित असलेली माहिती उपलब्ध करुन देणे यासाठी जबाबदार असून जन माहिती अधिकारी हा यांच्याकडे कार्यालयात प्राप्त होणारी सर्व पत्रे किंवा इतर सर्व प्राधिकरण व नागरीक यांच्याकडून प्राप्त होणारी माहिती, सूचना, तक्रार, निवेदने, निर्देश हे केवळ एका व्यक्तीच्या अखत्यारित नसतात. तसेच जन माहिती अधिकारी हे पद हे नागरीकांना माहितीचा अधिकार कायद्याखाली जास्तीत जास्त माहिती लवकरात लवकर प्रदान करण्याच्या दृष्टीने दिलेला अतिरिक्त कार्यभार असून सन २०२२ साली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रदान केलेले पत्र हे जन माहिती अधिकाऱ्यांना अग्रेषित केलेले नसून ते झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान केले असल्याची अपिलार्थींनीच नमूद केले आहे.

ही वस्तुस्थिती लक्षात घेता विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केलेला खुलासा स्विकारीत तथापि,अपिलार्थींनी त्यांच्या **जोडपत्र अ व तक्रार अर्ज** यात नमूद केल्याप्रमाणे जर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने असे पत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झाले असल्यास त्याचा कसोशिने शोध घेवून तसेच त्या पत्राची प्रत ही मा.महानगर पालिका आयुक्त यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेवून तक्रारदारास प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Maharashtra ★

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२६**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Jyotsna